शनिवार दि.१० ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३४२
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com


## महायुतीने राज्यात केवळ फोडाफोडीचे राजकारण केले

# ज्या मतदारसंघात ज्याला तिकीट मिळेल त्याला मदत करा-अनिल देशमुख

लोकनेता न्यूज नेटवर्क

पुणे (वृत्तसंस्था)

राज्यात मागील दोन वर्ष महायुती सरकार आहे परंतु केवळ फोडाफोडीचे राजकारण सुरु आहे. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पैसे, दम देऊन फोडली गेली. महागाई, बेरोजगारी, उद्योग स्थलांतर, भ्रष्टाचार असे अनेक प्रश्न जनतेसमोर आहे. जीएसटी चुकीच्या पध्दतीने लावले जात आहे. लोकसभेत आघाडीला ३१ जागा मिळाल्या असून यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्रित लढणार असल्याने जनतेने साथ द्यावी. विविध मतदारसंताघ अनेक जण इच्छुक पण शरद पवार यांच्यासाठी एक एक मतदारसंघ महत्वाचा असून ज्याला तिकिट मिळेल त्याचा प्रचार सर्वांनी करावा. महाराष्ट्रात सुसंस्कृत राजकारण होते परंतु ईडी,सीबीआय, आयकर धाकाने विरोधी नेत्यांना दाबले जाते, पळवले जात आहे असे मत माजी मंत्री अनिल देशमुख यांनी व्यक्त केले.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शिवनेरी येथून शिवस्वराज्य यात्रा शुक्रवारी प्रारंभ झाला. यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे, युवक प्रदेशाध्यक्ष मेहबुब शेख, आमदार अशोक पवार, भारती शेवाळे उपस्थित होते.

महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे म्हणाल्या, छत्रपती शिवरायांचे अनेक ऐतिहासिक घटना आपण पाहिल्या असून महाराजांचे काळातील स्वराज्य पुन्हा एकदा स्थापन व्हावे हे आपले स्वप्न आहे. आज महिलांचे रस्त्यावर अत्याचार होतात, डांबून ठेवले जाते परंतु दोषींवर सरकार कारवाई करत नाही, अनेक घटना घडल्या ज्यामुळे अंगावर शहारे येतात मणीपूरसारख्या घटना घडतात. महिला अनेकवेळा आंदोलन करुन थकतात परंतु कारवाई होत नाही. लाडकी बहीण योजनेतून १५०० रुपये देण्यापेक्षा सुरक्षित वातावरण आम्हाला हवे आहे. पैशाच्या अमिषास महिला बळी पडणार नाही. महिलांचे मन सरकारला कळले नसून छोटया गोष्टीत महिलेस आनंद असतो. बेरोजगारी, शेतीमालास भाव नाही, शेतकरी आत्महत्या, महागाई यामुळे जनता त्रस्त आहे. तरुणांचे हातास सरकार रोजगार देऊ शकत नाही त्यामुळे ते व्यसनाधीन होत आहे त्याची महिलांना भिती आहे.खासदार अमोल कोल्हे म्हणाले, शिवस्वराज्य यात्रा ही मराठी स्वाभिमानावर जो घाला घातला जातो त्यावर आवाज उठविण्यासाठी ही यात्रा आहे. खतासह वेगवेगळया गोष्टीवर मोठा जीएसटी लावला जात आहे, कांदावर निर्यातीस बंदी घातली जात आहे. ईडी-सीबीआयचा धाक दाखवला जातो. बेरोजगारीवर उपाय म्हणून केवळ सहा महिन्याची कंपन्यात इंर्टनशीप देण्याचे आश्वासन सांगितले जाते, अनेक प्रकल्प दुसऱ्या राज्यात नेले जात असल्याने आपले हक्काचे रोजगार जातात. सरकारच्या सर्व योजना फसव्या आहे. केवळ लाडकी खुर्ची योजनेसाठी पाहिजे तेवढे लोटांगण घातले जात आहे. मराठी स्वाभिमान गहाण ठेऊन स्वार्थाचे राजकारण केले जाते.



## महसूल पंधरवाडा कार्यक्रमा अंतर्गत महसूल दिन साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

बिलोरी । गौतम गावंडे



नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय येथे दि ०८ ऑगस्ट २०२४ रोजी महसूल पंधरवाडा कार्यक्रमांतर्गत माननीय जिल्हाधिकारी श्री.अभिजीतजी राऊत यांच्या अध्यक्षतेखाली महसूल दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरवात दीप प्रज्वल करून,व महसूल परिवारातील काही कर्मचारी गेल्यावर्षी मृत्यू पावले त्यांना दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली वाहण्यात आले,व महाराष्ट्रगिताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी श्री. अभिजीत राऊत तर प्रमुख पाहुणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.मीनल करणावाल,अप्पर जिल्हाधिकारी पी.एस.बोरगावकर,आर.डि.सि.महेश वडदकर,०८ डिप्टी कलेक्टर, १६ तहसीलदार,महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष,तलाठीसंघटनेचे अध्यक्ष श्री.मिसाळे ,कोतवाल संघटनेचे अध्यक्ष श्री.सुधाकर डोईवाड,सर्व कर्मचारी प्रा.कवि. अंनत राऊत यांच्या कविताने सर्वांना मंत्रमुक्त केले. पुढे महसूल कर्मचारी यांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार माननीय जिल्हाधिकारी साहेब यांच्या हस्ते करण्यात आले त्यात आदमपुर येथील रहिवासी व तहसील कार्यालय मुखेड शिपाई धम्मशिला दिलीप भुसावळे यांच्या दोन मुली श्रेया दिलीप भुसावळे हि बुल्लूबेल्स इंग्लिश मिडीयम स्कूल नायगाव येथुन १० वित ९६%२० तर श्रेयश्री दिलीप भुसावळे हि भास्करराव पाटील खतगावकर पब्लिक स्कूल शंकरनगर येथुन शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ०८ वि.मध्ये पास झाली त्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार पदोन्नती झालेले सर्व कर्मचारी,नवीन कोतवाल,नवीन पोलीस पाटील यांचा सामूहिक सत्कार करण्यात आला. नांदेड येथील ओम गार्डन येथे पार पडला. दोन्ही मुलीच्या यशाबद्दल सर्वच थरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## कृपाछत्र उपक्रमाला लोकसहभागातून छत्र्या दान देण्याचे आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

जितके वर्ष तितके लाभार्थी या तत्वानुसार कृपाछत्र उपक्रमाच्या ५ व्या वर्षी लोकसहभागातून २०२४ छत्र्या वितरणाचे उदिष्ट भाजपा व लायन्स तर्फे ठेवण्यात आले असून देणगीदारांची नावे छत्रीवर दोन्ही बाजूला छापून त्यांच्याच हस्ते वितरण करण्यात येणार असल्याची माहिती संयोजक धर्मभूषण ड.दिलीप ठाकूर यांनी दिली आहे

भाजपा नांदेड महानगर, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी कृपाछत्र हा उपक्रम राबविण्यात येतो.यासाठी खा.अशोकराव चव्हाण,माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, खा.डॉ. अजित गोपछडे, मराठवाडा प्रदेश संघटन मंत्री संजय कोडगे,महानगराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते,भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे व ड. किशोर देशमुख,ला. योगेश जैस्वाल, लायन्स सेंट्रल अध्यक्ष शिवाजीराव पाटील यांचे मार्गदर्शन मिळत आहे.नांदेड जिल्ह्यात जागोजागी अतिवृष्टी होत असून गोरगरीब जनतेची अडचण



लक्षात घेऊन शंभर टक्के लोकसहभागातून खऱ्या गरजूंना छत्र्या देण्यात येणार आहेत. त्यामध्ये सफाई कामगार, वृद्धाश्रम, अनाथाश्रम, वृत्तपत्र विक्रेते, रस्त्यावरील बेघर यांना छत्री वाटप करण्यात येते.आता पर्यंत १९४छत्र्यांसाठी देणगीदार मिळाले आहेत.त्यामध्ये धर्मभूषण ड.दिलीप ठाकूर यांच्यातर्फे ५० तर हॉटेल मिडलँड गोकुळनगर नांदेड यांच्यातर्फे ३२ छत्र्या मिळाल्या आहेत. प्रत्येकी १६ छत्र्या देणाऱ्या मध्ये प्रमिला महेश भालके,

कै.आशुतोष भाकरे यांच्या स्मरणार्थ डॉ. गोविंद भाकरे,एक राम भक्त,अशोक विठ्ठलराव पडगीलवार,स्वर्गीय पुष्कर राज जायसवाल हैदराबाद यांच्या स्मरणार्थ स्नेहलता जायसवाल,

रुहिका रूपेश मुत्तेपवार, स्वर्गीय उर्मिला देवी जायसवाल हैदराबाद यांच्या स्मरणार्थ स्नेहलता जायसवाल यांचा समावेश आहे .छत्र्या घाऊक बाजारातून मधून खरेदी करण्यात येत असून दोन्ही बाजूला नाव छपाईच्या शुल्कासह किमान १६ छत्र्यासाठी रू.२५०० देणगी देणाऱ्यांची नावे छत्र्यांवर रबर प्रिंटिंग द्वारे छापण्यात येणार आहेत. ज्यांनी जितक्या छत्र्या दिल्या तितक्या छत्र्यांचे त्याच देणगीदारांच्या हस्ते वाटप करण्यात येणार आहे. देणगीदारांची माहिती सोशल मीडिया च्या मार्फत पन्नास हजार लोकापर्यंत प्रसिद्ध केली जाणार आहे. उद्दिष्ट पूर्तीसाठी १८३० छत्र्यांची आवश्यकता असल्यामुळे दानशूर नागरिकांनी भरभरून प्रतिसाद द्यावा असे आवाहन भाजपा नांदेड महानगर,लायन्स क्लब नांदेड सेंट्रल तर्फे करण्यात आले आहे.

### भारतात गणेश उत्सोवाला

## राष्ट्रीय सन घोषित करा राज ठाकरे व जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे मागणी

### जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

भारतात गणेशोत्सवाला राष्ट्रीय सन घोषित करण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे मनसे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी मा. राजसाहेब ठाकरे व बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

भारत पारतंत्र्यात असताना इंग्रज सरकारने त्याकाळी भारतीय लोकांना एकत्रितपणे येण्याची बंदी घालण्यात आली होती जर भारतीय लोक संघटीत झाले तर इंग्रज सरकारला धोका निर्माण होऊ शकतो.त्यामुळे लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य लढ्याबाबत जागरूकता निर्माण होण्यासाठी १८९४ मध्ये पुण्यातील विंचुरकर वाड्यात सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली.सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून त्यांनी स्वातंत्र्य चळवळीची ज्योत पेटवली स्वातंत्र्य चळवळीत




गणेशोत्सवाचे मोठं योगदान असल्याने गणेशोत्सवाला राष्ट्रीय सन घोषित करण्यात यावा अशी मागणी मा.राजसाहेब ठाकरे व जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे मनसेचे शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर, सहकार सेना जिल्हाध्यक्ष अशोक सुरवसे,जिल्हा उपाध्यक्ष सतीश शिंदे,संजय सानप,संजय फरताडे,बाबासाहेब दिंडे,लहू भवर,मच्छिंद्र गरजे,आदींनी मागणी केली आहे.

### चारोळी

काळ्या मातीच्या सेवेत
भाऊरायाने आयुष्य अर्पिले
टिपूर मोत्यावाणी धान येता
काळजात ते क्षण जपिले.

रंजना सानप
मायणी (सातारा)

झाडे लावा झाडे जगवा



## मारोतराव कवळे गुरूजी यांच्या हस्ते क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या फलकाचे अनावरण संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

धरती आबा आदिवासी जननायक क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या क्रांतिकारी जन्म दिनी जारीकोट ता धर्माबाद येथे नायगाव विधानसभा मतदारसंघाचे भावी आमदार मारोतराव कवळे गुरुजी यांच्या शुभहस्ते फलकाचे अनावरण संपन्न झाले. क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांची ९ आगस्ट रोजी जयंती असल्यामुळे जागतिक क्रांतिकारी दिनी जारीकोट ता धर्माबाद येथे शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरूजी यांच्या शुभहस्ते फलकाचे अनावरण करण्यात आले यावेळी उपस्थित माजी सभापती तथा उमरी मार्केट कमिटी संचालक बापुराव पाटील करकाळेकर, माजी पंचायत समिती सदस्य नागेशजी रामोड, सरपंच केशवराव रामोड, स्वस्त धान्य दुकानदार सायलू गंठोड,माजी चेअरमन राजेश्वर गंठोड, आदर्श शिक्षक लक्ष्मणराव पाटील मुपडे, सर्व मनेरवालु समाज जारीकोट चे युवा मित्र मंडळ उपस्थित होते.





## इंदापूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी पारंपरिक खेळात सहभागी होऊन लुटला आनंद

लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ येथील कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय कनिष्ठ विभागाच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन पाटील,संस्थेचे संचालक युवानेते राजवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जीवन सरवदे आणि उपप्राचार्य प्रा.दत्तात्रय गोळे यांच्या प्रेरणेने क्रीडा व सांस्कृतिक विभागाने



नागपंचमी निमित्ताने क्रीडांगणावर आयोजित केलेल्या पारंपारिक खेळामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन आनंद लुटला.

नागपंचमी सणानिमित्त महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाच्या कला व वाणिज्य विभागामधील मुलांनी व मुलींनी उत्साहामध्ये आट्या-पट्या( सूर पट्ट्या ) कबड्डी, खो-खो ,व्हॉलीबॉल,मुलींचे पारंपारिक खेळ यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होत आपला आनंद द्विगुणित केला.

क्रीडा विभाग प्रमुख प्रा.बापू घोगरे आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.रोहिदास भांगे तसेच सहकारी प्राध्यापक यांनी उत्कृष्ट नियोजन करीत सहभागी खेळाडूंना प्रोत्साहन दिले.

संपादकीय

# दैव देते अन...



लोकनेता न्यूज नेटवर्क

भारताच्या इतिहासामध्ये बुधवारचा दिवस एका विचित्र कारणासाठी नोंदविला जाईल. ऑलिम्पिकसारख्या स्पर्धेमध्ये, कुस्तीत अंतिम फेरी गाठल्यानंतरही वजन जास्त भरल्यामुळे विनेश फोगटला बाद ठरविण्यात आले आणि कोट्यवधी भारतीयांच्या आशा-आकांक्षांचा चुराडा झाला. त्यानंतर देशात उमटलेल्या प्रतिक्रिया, खुलासे, प्रतिखुलासे, आक्षेप, समर्थन हे सगळेच अचंबित करणारे होते. वास्तविक, ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांमध्ये नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली जाते, याचे ज्ञान विनेशसारख्या अनुभवी खेळाडूला, तिच्या प्रशिक्षकांना व साहायकांना नसेल, हे म्हणणे भाबडेपणाचे ठरेल. एकाच दिवसामध्ये तीन लढती जिंकल्यानंतर विनेश सुवर्णपदकाला गवसणी घालेल, अशी अपेक्षा असतानाच तिला बाद ठरविण्याचा जाहीर झालेला निर्णय धक्कादायक होताच; पण त्याचबरोबर कोणत्याही गोष्टीवरून राजकारण कसे करता येते, याचे उदाहरण दाखविणारा होता.

ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांमध्ये वैयक्तिक खेळांत पदक मिळविणे वगैरे आपल्या देशात स्वप्नरूपातच होते. गेल्या शतकामध्ये भारताच्या नावावर वैयक्तिक पदके चार. यातील दोन स्वातंत्र्यपूर्व काळातील, त्यामुळे ती भारताच्या नावावर नोंदवायची किंवा नाही यावर वाद सुरू आहे. गेल्या पंचवीस वर्षांमध्ये आपल्याला खऱ्या अर्थाने वैयक्तिक पदकांची किंमत कळू लागली. त्या दृष्टीने गुंतवणुकीस प्रारंभ झाला. टोकियो ऑलिम्पिकमधील सात पदके ही आपली सर्वोच्च कमाई. या स्पर्धेमध्येही तशीच कामगिरी बजावण्याच्या अपेक्षेने भारतीय पथक पॅरिसमध्ये दाखल झाले. तीन पदकांची कमाई झाल्यानंतर, भारत हा आकडा सहज गाठेल असे वाटू लागले. त्यानंतर मात्र आपले खेळाडू मानसिक तयारीमध्ये कमी पडत असल्याचे चित्र निर्माण झाले. विनेशची गोष्ट आणखी वेगळी. भारतीय कुस्ती महासंघाचे तत्कालीन अध्यक्ष ब्रिजभूषणसिंह यांच्या विरोधात कुस्तीगीर खेळाडूंनी आंदोलन केले; त्यामध्ये विनेश आघाडीवर होती. तो वाद अनेक दिवस चालला. त्यानंतर विनेशने स्पर्धेची तयारी केली. तिला आवश्यक प्रशिक्षक, आहारतज्ज्ञ, फिजिओथेरपिस्ट; तसेच परदेशातील प्रशिक्षण सरकारने उपलब्ध करून दिले. अर्थात, हे सगळे केल्याशिवाय पदकविजेते घडत नाहीत, हे आपल्याला उशिरा का होईना आता कळले आहे. हे झाल्यावर खेळाडूंची जबाबदारी सुरू होते. विनेशच्या बाबतीत स्पर्धेच्या आधी काही महिने खालच्या वजनगटात खेळण्याच्या निर्णयाने तिची जबाबदारी वाढविली.स्पर्धेच्या प्रारंभापूर्वी झालेल्या वजनचाचणीमध्ये उत्तीर्ण झाल्यानेच ती अंतिम फेरीपर्यंत धडक मारू शकली. मात्र, अंतिम फेरीपूर्वीची रात्र काळरात्र ठरली. तिचे वजन तब्बल दोन किलो सातशे ग्रॅमने वाढलेले आढळले. संपूर्ण रात्र विविध उपाय करूनही ते कमी झाले नाही; आपण खेळू शकणार नाही, हे विनेश आणि तिच्या सहकाऱ्यांना कळले होते. ऑलिम्पिक समितीने सकाळी त्यावर शिक्कामोर्तब केले. त्यानंतर भारतामध्ये प्रचंड प्रतिक्रिया उमटल्या. सुवर्णपदकांचा दुष्काळ असलेल्या आपल्या देशामध्ये ते अपेक्षित होते. राजकारण्यांच्या प्रतिक्रिया धक्कादायक होत्या. विनेशच्या विरोधात कारस्थान करण्यात आले आहे येथपासून आंदोलन केले म्हणून तिचा परस्पर काटा काढण्यात आला, येथपर्यंत प्रतिक्रिया नोंदवून राजकारण्यांनी आपली पातळी व लायकी दाखवून दिली. हा खेळ आहे; त्याचे काही नियम आहेत हे मान्यच करायला ही मंडळी तयार नव्हती. वास्तविक, विनेशबद्दल कितीही सहानुभूती वाटली, तरी शेवटी चूक तिच्याकडूनच झाली, हे लक्षात घेतले पाहिजे. त्याला जबाबदार कोण, यावर काथ्याकूट करून आता उपयोग नाही. झाले ते स्वीकारून पुढे जाण्याला पर्याय नाही. माजी बॅडमिंटनपटू प्रकाश पदुकोण यांनी दोनच दिवसांपूर्वी 'एक्स'वरून प्रतिक्रिया व्यक्त करताना, खेळाडूंनी आता जबाबदारी घेतली पाहिजे, असे वक्तव्य केले. प्रकाश बोलले त्यात तथ्य आहे.ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांमध्ये सेकंदाच्या शतांश भागाने पदक गमाविण्याचा एकदा नव्हे, तर दोनदा अनुभव असलेल्या आपल्या खेळाडूंना ही स्पर्धा फक्त शारीरिक क्षमतेची नव्हे, तर त्यापेक्षा अधिक मानसिक क्षमतेची असते, याची जाणीव असायलाच हवी. ती मानसिक तयारी त्यांनाच करावी लागणार आहे. साधने, सोयीसुविधा पुरविण्यासाठी सरकार आहे, पुरस्कर्ते आहेत. मात्र, शेवटी विजय सोपानावर चढण्यासाठी लागणारी विजीगिष् वृत्ती आणि मानसिक संतुलन खेळाडूलाच कमवावे लागते. विनेशच्या प्रकरणातून हा धडा खेळाडू घेतील, अशी अपेक्षा करू या. एकूण हे प्रकरण म्हणजे दैव देते आणि कर्म नेते याचीच प्रचिती म्हटली पाहिजे.

# आंध्रप्रदेशाची लोकनृत्ये

लोकनेता न्युज नेटवर्क



१.डप्पू वाद्यंम : 'डप्पू'नावाचे ढोलासारखे एक वाद्य असते.हे वाद्य हातात घेऊन नर्तक पुढे-मागे होत हे नृत्य करतात.त्यामुळेच या नृत्याला 'डप्पू वाद्यम ' नाव असते.

२.माथुरी:हे नृत्य स्त्रिया आणि पुरुष दोघे मिळून एकमेकांसमोर उभे राहून करतात.पुरुषांच्या हातात छोट्या लाकडी काठ्या असतात, ज्यांना टिपरीप्रमाणे एकमेकांवर आपटून वाजविले जाते आणि त्याला स्त्रिया टाळ्या वाजवून साथ देतात.

३.वथकम्मा : हे लोकनृत्य विवाहप्रसंगी केवळ स्त्रियाच करतात.सैजानबाई नावाच्या एका स्त्रीबद्दलच्या प्राचीन कथा यामध्ये कथा सादर केल्या जातात.

४.लंबाडी:आंध्रप्रदेशमध्ये 'लंबाडी'ही एक जमात आहे.यांना 'बंजारे'असेही म्हणतात.त्यांच्यातील स्त्रिया रंगीबेरंगी वेशभूषा करून हे नृत्य करतात.रात्रीच्या वेळी मोठी शेकोटी करून त्याभोवती सर्व स्त्री-पुरुष हे नृत्य करतात.

५.सिद्धी : ब्रिटिश राजवटी वेळी आंध्रच्या राजांनी त्यांच्या संरक्षणासाठी आफ्रिकन वंशाच्या सक्षम लोकांना अंगरक्षक म्हणून ठेवून घेतले होते.या लोकांनाच 'सिद्धी'म्हणतात.नंतर हळूहळू हा वर्ग वाढत गेला आणि तेदेखील इथल्या संस्कृतीशी जोडले गेले.त्यामुळे त्यांनी हैद्राबाद येथे आपले वास्तव्य कायम केले.त्यांनी केलेले नृत्य 'सिद्धी' या त्यांच्याच नावाने ओळखले जाऊ लागले .हे सिद्धी लोक मूळचे आफ्रिकन असल्याने त्यांचे हे नृत्य त्यांची वेशभूषेचा यावर तीकडच्याच प्रभाव अधिक आहे.यातील गाण्यामध्ये राजाबद्दलची त्यांची भावना तसेच नृत्यामध्ये जोरदारपणा दिसून येतो .ही गाणी तेलगू,हिंदी,आफ्रिकन या भाषातील असतात.या नृत्यामध्ये वीररसातील भाव अधिक असतात .

**भारतीय लोकनृत्य**

'सिद्धी नृत्य' आंध्र आणि आफ्रिका यांचा सुरेख संगम मानले जाते.या नृत्याबरोबरच कुम्मी आणि कोलाअट्टम ही नृत्येदेखील तामिळनाडू बरोबरच तितकीच लोकप्रिय आहेत.आणखी एक बाब अशी, की सात शास्त्रीय नृत्यांपैकी एक असणारे 'कुचिपुडी'हे नृत्य पूर्वी लोकनृत्य म्हणूनच गणले जायचे;पण अलीकडेच या नृत्याला शास्त्रीय नृत्य म्हणून मान्यता मिळाली आहे .

**आधारग्रंथ : भरतनाट्यम भाग १ डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग)**

**रेणू जोशी (अभिनेत्री, नृत्यदिग्दर्शिका,लेखिका)**

# स्त्री-पुरुष सर्वांचा आंदोलनात सहभाग!

लोकनेता न्यूज नेटवर्क

आजच्या दिवशी- दि.८ ऑगस्ट १९४२रोजी रात्रीपासूनच भारतीय स्वातंत्र्य लढ्याची मनसुबे तयार झालीत. महात्मा गांधीजींनी छोडो भारत व करेंगे या मरेंगेचा नारा दिला होता. यामुळे संपूर्ण देश पेटून उठला. शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्याचे आंदोलन करणार्या काँग्रेस आणि नेत्यांनी प्रथमच क्रांतीची भाषा वापरली होती. त्यामुळे हा क्रांतीदिन म्हणून पुढे ओळखला जाऊ लागला. ८ ऑगस्ट हा दिवस भारतीय स्वातंत्र्याच्या लढाईतील शेवटचा दिवस म्हणूनही स्मरण केला जातो. म.गांधींच्या नेतृत्वात भारत छोडो आंदोलनाला या दिवशी सुरुवात झाली होती. त्यानंतर ९ ऑगस्ट रोजी गांधींसह ज्येष्ठ नेत्यांना अटक करण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण भारत इंग्रजांविरुद्ध एकवटला होता. देशावासियांच्या या एकजुटीने इंग्रज सरकारला गुडघे टेकायला भाग पाडले. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यानंतर क्रांती दिन साजरा केला जाऊ लागला. मुंबईतील ज्या मैदानावर झेंडा फडकावत या आंदोलनाला सुरुवात झाली होती. त्या मैदानाला क्रांती मैदान हे नाव देण्यात आले आहे. भारतीयांनी पुकारलेला सन १८५७ नंतरचा हा सर्वात मोठा स्वातंत्र्य लढा होता. आज आपल्या देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या सर्व नाम-अनाम क्रांतीकारकांना विनम्र अभिवादन करुयात! असा हा श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजींचा प्रेरणादायी लेख.... संपादक.

देशभरात ब्रिटिश सत्तेला हाकलून लावण्यासाठी पुढे आंदोलनांना सुरवात झाली. ब्रिटिश सत्ता पार हादरून गेली होती. हे रोखायचे कसे? असा प्रश्न त्यांना पडला होता. अशात हे आंदोलन देशभर पसरणार म्हणून ९ ऑगस्टच्या पहाटेच म.गांधी, पंडित नेहरू, वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद यांच्यासह अनके काँग्रेस नेत्यांना पकडून तुरुंगात टाकण्यात आले. भारतीय जनमानसात असंतोषाचा विस्फोट झाला, त्यामुळे ब्रिटिश शासन भयभीत झाले. एकाच वेळी देशभर कारवाया सुरू झाल्या व महत्त्वाच्या कार्यकर्त्यांना अटक सत्र सुरू केले अनेक नेते भूमिगत झाले. देशभर पोलीस ठाण्यावर व मामलेदार कचेरीवर, सरकारी कार्यालयांवर मोर्चे निघू लागले. युवक हातात तिरंगा झेंडा घेऊन घोषणा देत लाठीचार्ज व गोळीबार झेलत धैर्याने तिरंगा फडकवू लागले. समाजवाद्यांनी भूमिगत कारवायांवर लक्ष केले. रेल्वे स्थानके मोडतोड, रूळ उखडणे, पोस्ट कार्यालय जाळणे, वीज तोडणे, गनिमी पद्धतीने ही कामे सुरू झाली. पोलिसांकडून अटक सत्र सुरू झाले. व्यापारी, विद्यार्थी, नोकरदार, सामान्य नागरिक, स्त्री-पुरुष सर्व या आंदोलनात सहभागी झाले. देशभरातील युवकांनी यात भाग घेतला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्फूर्तीदायी ठरलेल्या या दिवसाची आठवण तसेच नव्या पिढीला क्रांतिकारकांच्या त्यागाची जाणीव रहावी, यासाठी दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी क्रांतीदिन साजरा केला जातो.देशभर स्वातंत्र्याचे व देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. चले जावमुळे क्रांतिसिंह नाना पाटील यांनी महाराष्ट्रात प्रतिसरकारची स्थापना केली. हे आंदोलन उभे राहण्याआधीच ब्रिटिश सरकारने मोडून काढण्याचे ठरवले होते. त्या पद्धतीने देशभर कारवाया केल्या व आंदोलन मोडून काढले. परंतु या आंदोलनाने जगाला वेगळी ओळख दिली. कारण कोणताच सेनापती नसताना स्वातंत्र्याचे युद्ध जनतेने हातात घेतले होते. यामुळेच भारताच्या स्वातंत्र्याचा विचार केला जाऊ लागला, हे विशेष. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात दि.९ ऑगस्ट १९४२ या दिवसाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दिवशी तत्कालीन काँग्रेसच्या नेतृत्वाने भारतातील इंग्रज सरकारला चले जावचा इशारा दिला. या दिवसापासून स्वातंत्र्यासाठी लढणार्या भारतीयांनी करेंगे या मरेंगे अशी निर्वाणीची भूमिका घेतली. इंग्रजांना छोडो भारत हा अखेरचा इशारा दिला होता. या आंदोलनाला गांधीजींनी अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या मुंबई अधिवेशनात सुरूवात केली होते. यामुळे जणू एक क्रांतीची जोतच पेटली होती. त्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून स्वातंत्र्य लढ्यात आपले योगदान देणाऱ्या सर्व थोर पुरूषांना विनंम्र अभिवादन!

देशभरात ऑगस्ट क्रांती दिन साजरा होत आहे. इंग्रजांनी भारताला स्वतंत्र करण्यासाठी दिलेला शब्द न पाळल्यामुळे या आंदोलनाला सुरुवात झाली होती. ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारताला स्वतंत्र करणार असल्याचे इंग्रजांनी म्हटले होते. मात्र ऐनवेळी इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे म.गांधींनी देशभर ऑगस्ट क्रांती आंदोलनाची घोषणा केली. या आंदोलनाला भारत छोडो, असे नाव देण्यात आले होते. करो या मरो, अशी या आंदोलनाची घोषणा होती. शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्याचे आंदोलन करणाऱ्या काँग्रेस आणि थोर नेत्यानी प्रथमच क्रांतीची भाषा वापरली होती. त्यामुळे ९ ऑगस्ट हा दिवस क्रांतिदिन म्हणून ओळखला जाऊ लागला. मात्र, इतकी कठोर भूमिका घेतल्या नंतर पाच वर्षांनी आपल्याला स्वातंत्र्य लाभले. दि. ९ ऑगस्ट १९४२ ते १५ ऑगस्ट १९४७ हा कालावधी प्रत्येक भारतीयाने लक्षात ठेवायला हवा, इतका तो ऐतिहासिक आणि महत्त्वाचा आहे. दरम्यान, गांधींच्या नेतृत्वात इंग्रज सरकारविरुद्ध फार मोठ्या प्रमाणावर देशभर अहिंसक जनआंदोलन लवकरच उभे राहील, अशा शब्दांत महासमितीने आपला निर्धार व्यक्त केला होता. त्यामुळेच गांधी, पंडित नेहरू, मौलाना आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, अशा ज्येष्ठ नेत्यांना ९ ऑगस्टच्या पहाटेच इंग्रज सरकारने अटक करून अज्ञातस्थळी रवाना केले होते. सरकारने त्यांना कुठे ठेवले ह्याची गुप्तता पाळली होती. मात्र, तरी बातमी फुटलीच. गांधीजींना पुण्यात आगाखान पॅलेसमध्ये आणि नेहरू, पटेल, आझाद या मंडळींना अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवण्यात आल्याचे समजले. देशभर जागोजागी हरताळ, मिरवणुका, मोर्चे यांना ऊत आले. सरकारने लोकांना एकत्र जमण्यास बंदी घातली. पण लोक आता आदेश मानायला तयार नव्हते. पोलिसांच्या लाठीहल्ल्याला, गोळीबाराला जुमानत नव्हते. जाळपोळ, पोलिसांचे खून, टेलिफोन व तारा कापणे असे प्रकार सुरू झाले. यासर्व प्रकाराला सरकारने गांधीजींना जबाबदार ठरवले. त्याचा निषेधार्थ गांधीजीने २१ दिवसांचे अंदोलनही केले होते. प्रतिसरकारमुळे मूळ सरकार खवळेले आणि त्यांनी दडपशाही सुरू केली. त्यात हजारांहून अधिक मृत्यू, तितकेच जखमी, महिलांची विटंबना तर लाखोंना अटक केली होती, अशा नोंदी आहेत. ही चळवळ युद्धासारखी होती. या लढाईत योगदान देणाऱ्या सर्व प्रकारच्या क्रांतिलढ्यांना वंदन!

दुसऱ्या महायुद्धात भारताने इंग्रजांना मदत केली. त्यावेळी इंग्रजांनी भारत सोडून जाण्याचे वचन दिले होते. मात्र ऐनवेळी दिलेला शब्द न पाळता इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देण्यास नकार दिला. त्यामुळे दि.८ ऑगस्ट १९४२ रोजी भारतीय काँग्रेस कमिटीच्या मुंबईतील अधिवेशनात भारत छोडो आंदोलनाचा प्रस्ताव संमत करण्यात आला. त्यानंतर इंग्रजांनी गांधींजींना पुण्यातील आगा खाँ तुरुंगात कैद केले. तसेच, स्वातंत्र्य चळवळीतील इतर नेत्यांनाही अटक करण्यात आली. त्यावेळी तरुण कार्यकर्त्या अरुणा असिफ अली यांनी ९ ऑगस्ट रोजी मुंबईतील ग्वालिया टँक मैदानात तिरंगा फडकावत भारत छोडो आंदोलनाचा शंखनाद केला. मात्र, गांधीजींनी हेही आंदोलन अहिंसक मार्गानेच करावे, असे आवाहन देशवासियांना केले होते. तरीही देशातील अनेक भागात हिंसा आणि तोडफोड करण्यात आली होती. दुसऱ्या महायुद्धामुळे ब्रिटीश सरकार अगोदरच खिळखिळे बनले होते. तर या आंदोलनामुळे ब्रिटीशांची उरली-सुरली ताकदही लोप पावत गेली. त्यानंतर देशवासियांनी इंग्रजांना हाकलून लावेपर्यंत हे आंदोलन सुरुच ठेवले. भारताला दि.१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. या आंदोलनात आपले बलिदान देणाऱ्या नागरिकांना श्रद्धांजली म्हणून हा ऑगस्ट क्रांती दिन साजरा केला जातो.!! ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त सर्व देशप्रेमी भारतीयांना वंदे मातरम् !!

# भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील सुवर्ण पान : ऑगस्ट क्रांती दिन

लोकनेता न्यूज नेटवर्क

भारत छोडो आंदोलन किंवा ऑगस्ट क्रांती हे ऑगस्ट १९४२ मध्ये संपूर्ण स्वराज्यासाठी सुरू झालेले नागरी असहकार आंदोलन चले जाव चळवळ होते. गांधीजींच्या करा किंवा मरा ह्या संदेशाने या आंदोलनाची सुरुवात झाली होती. मुंबई येथे ८ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी भारत छोडोचा नारा देऊन ब्रिटीशांविरोधात स्वातंत्र प्राप्तीसाठी आंदोलन उभारले होते. महात्मा गांधींजीसह काँगेस श्रेष्ठींना ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडो आंदोलनाचा एक भाग म्हणून अटक करण्यात आली होती. या आंदोलनाचा गुप्त मसुदा सेवाग्राम येथे ९ जुलै रोजी बापुकुटीतील आदी निवासात तयार करण्यात आला होता आणि १५ जुलै रोजी काँग्रेस कार्य समितीतर्फे त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले होते. त्या मसुद्याला पुढे वर्धा ठराव म्हणून मान्यता देण्यात आली आणि ९ जुलै २०१८ रोजी चले जाव चळवळीचा ७५ वा वर्धापन दिन संपन्न झाला. १९४२ साली याच तारखेला महात्मा गांधी यांनी ब्रिटीशांना चले जावचा आदेश दिला आणि त्या आदेशाने भारतातली जनता पेटून उठली. तिने उत्स्फूर्तपणे गावागावात सरकारच्या विरोधात आंदोलन केले. ह्या आन्दोलनाचे प्रतिसाद शहरी भागासह ग्रामीण भागातही पसरले. तत्कालीन ग्रामीण भागातील अग्रनी कार्यकर्ते असणारे बुलडाणा जिल्ह्यातील, नागझरी गावचे रखमाजी कायंदे (सावकार) यांनी शेकडो कार्यकर्ते आपल्या स्वखर्चाने मुंबईला आंदोलनात सहभागी केले होते. सेवाग्राम येथे झालेल्या या मसुदा बैठकीत जनआंदोलनाचे नियम, आंदोलन पुढे नेण्याचे सर्व अधिकार महात्मा गांधींकडे देण्यात येत असल्याचे यावेळी ठरविण्यात आले होते.

आत्मक्लेश करणारी व्यक्ती क्रांतिकारक अशी व्यक्ती असते. क्रांतिकारक हा शब्द विशेषण म्हणून वापरला जाऊ शकतो; समाजावर किंवा मानवाच्या काही पैलूंवर मोठा प्रभाव पडतो, कारण त्याला सर्वस्वी ठरविले जाते. 'क्रांतीकारी' याचा अर्थ असा क्रांतिकारी आहे जो एखाद्या व्यवस्थेविरुद्ध बंड करतो किंवा अन्याय, हिंसा किंवा काहीतरी चुकीचे आणि अस्वीकार्य अशा निर्णयाविरुद्ध बंड करतो. क्रांतीकारी ही अशी व्यक्ती आहे जी एकतर विद्रोह करते किंवा सद्य परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी त्याचे समर्थन करते.या ऐतिहासिक 'चले जाव' आंदोलनात ८ ऑगस्ट रोजी गोवालिया टँक मैदानावर 'वंदे मातरम्' हे प्रेरणादायी, वंदनीय गीत संपूर्ण कडव्यांसहीत संगीतकलानिधी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर उर्फ मास्तर कृष्णराव यांनी झिंझोटी रागात तयार केलेल्या स्वकृत चालीत गाऊन सादर केले. यावेळी पेटून उठलेल्या भव्य जनसमुदयासमोर हे तेजस्वी गीत गाण्यासाठी प्रसिद्ध गायक व कट्टर देशभक्त असलेल्या मास्तर कृष्णरावांचीच निवड करण्यात आली होती. या गीतावर इंग्रजांनी बंदी घातलेली असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या गीताचे संपूर्ण कडव्यांसहित जाहीर गायन करणे हे फार मोठे धाडस होते. या आंदोलनात जनता मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली. देशभरात ९ लाख लोकांनी स्वतःला अटक करवून घेतली. दुसऱ्या महायुद्धानंतर सन १९४५ मध्ये इंग्लंड सत्ता बदल होऊन मेजर क्लमेंट ॲटली यांच्या नेतृत्वाखाली त्रिमंत्री योजना सुरुवातीपासून भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत अनुकूल होती. मार्च १९४७ मध्ये पार्लमेंटमध्ये बोलतांना मेजर क्लमेंट ॲटली याने भारताविषयी धोरण स्पष्ट केले. इंग्लंड लवकरच भारताला स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करेल व त्यासंबंधी वाटाघाटी करण्याकरिता भारतात त्रिमंत्री कमिशन पाठविण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. मेजर ॲटली यांच्या घोषणेनुसार २४ मार्च १९४६ रोजी त्रिमंत्री कमिशन भारतात आले. स्ट्रॅफर्ड क्रिप्स, लॉर्ड पेथिक लॉरेन्स व अलेक्झांडर हे तीन सभासद होते. या त्रिमंत्री कमिशनने राष्ट्रीय काँग्रेसची स्वातंत्र्याची मागणी करून एक योजना मांडली, ही योजना म्हणेजच त्रिमंत्री योजना होय. त्यानंतर २४ मार्च १९४७ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन भारतात आले. भारतात आल्याबरोबर निरनिराळ्या नेत्यांच्या भेटी घेऊन त्यांनी फाळणीची योजना तयार केली. ३ जून १९४७ रोजी ही योजना प्रसिद्ध करण्यात आली. मुस्लिम लीग व राष्ट्रीय काँग्रेसने या योजनेला मान्यता दिल्यानंतर १८ जुल, १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने यांवर ठराव पास केला. ब्रिटिश पार्लमेंटने पास केलेल्या भारताविषयीचा हा ठराव म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचा कायदा होय. अशा रितीने स्वातंत्र्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत हा स्वतंत्र झाला.भारताच्या इतिहासात ९ ऑगस्ट हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन या नावाने साजरा केला जातो. भारत छोडो आंदोलन ही भारताच्या स्वातंत्र्याच्या लढाईतील एक महत्त्वाची घटना आहे आणि दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी भारत छोडो आंदोलन दिन म्हणून पण साजरा केला जातो. हा दिवस १९४२ मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटीश राजवटीच्या विरोधात जन आंदोलन सुरू केला होता. आजदिनी ८२ व्या ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शुभेच्छा !

दैनिक लोकनेता



# राज्यातील सर्व दिव्यांग छत्रपती संभाजीनगर शहरात होणाऱ्या आक्रोश मोर्चात सहभाग नोंदविला

## पाऊस पाण्याची कसलीही परवा न करता दिव्यांगाचे आधारवड आ.बच्चु कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्यातील महिला अध्यक्ष रोहीनी पोतदार यांनी गाड्यांचा ताफासह दिव्यांच्या विविध मागण्यासाठी एकजुटीने आक्रोश मोर्चात सहभाग नोंदवला..!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

संभाजीनगर येथील दिव्यांग आक्रोश मोर्चा त दिव्यांगाचे आधारवड सर्वा सर्वी दिव्यांगांचे दैवत आ.बच्चू भाऊ कडू यांच्या आदेशाचे पालन करून व प्रहार पक्ष संपर्क प्रमुख रामदास खोत, प्रहार संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष शिवाजीराव गाडे,जिल्हा अध्यक्ष रघुनाथ तोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी येथील महिला अध्यक्ष रोहिणी पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्यातील शेकडो दिव्यांग बंधू-भगिनीचे दि ९ ऑगस्ट रोजी संभाजीनगर येथील आक्रोश मोर्चात गाड्यांच्या ताफ्यासह आष्टी तालुक्यातील प्रहार संघटनेचे दिव्यांग संघटनेचे सामाजिक कार्यकर्ते तथा पुरोगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब साबळे,प्रहार दिव्यांग संघटनेचे नेते मनोहर पोतदार,आष्टी संघटनेचे शहराध्यक्ष विशाल मस्के,दिव्यांग सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब शिरोळे,सुधाकर देशमुख, अविनाश विटकर,सतीश घोडके, अक्षय ससाने,चंद्रकांत जपल वार,खराडे श्रीकांत,बेद्रे अक्षय , इम्रान





काझी,कोल्हे,ससाने, पद्मिनी बाई म्हस्के,शांताबाई गायकवाड,अनिता सातारे,सुमन रोकडे,संगीता घनघाव,संगीता घनघाव,पद्मा लोंढे,जनाबाई वाल्हेकर,अंतिका वाल्लेकर, अंगारके मॅडम,रंभाबाई बांगर, शबाना शेख,तनया शेख,अशोक बांगर,राधा सोनवणे,शोभा बांगर, आशा बांगर,विजय बांगर, अश्विनी गायकवाड,मेहमूद शेख, शाबिर इमाम,लष्कर नरसु, सखुबाई काळे,आशाबाई सायकड,परीगाबाई राजपुरे, कसलम काझी,नसरीन सय्यद, श्रेयस देशमुख,कोमल पंडागळे, रंजीत मेहबूब,मालन सय्यद, रोशन उस्मान,आदम उस्मान, शेख इ स्माईल,रुकसाना मेहता, केशरबाई ससाने,नर्मदा काळे, वृंदावनी घनगाव,सरस्वती सुरोशे,रेखा गायकवाड,कल्पना अंगारके,साखरबाई अंगारके,मोविन सय्यद,शेखास आसफाक,असिफा शेख, नसरुद्दीन सय्यद,आरती वाल्लेकर,बुरान सय्यद,शबिरा सय्यद,महिना सय्यद,साबिदा सय्यद,काशीबाई वाल्हेकर, पार्वती वेताळ,सय्यद पुतळी,बाबू कांबळे,मोहिदा सय्यद,चांद सय्यद,साळू राजगुरू,सोन्या सुधाकर देशमुख बापू घुगे, विजया पालखेड,बाळासाहेब आंधळे,सुमन कोले भालेकर ताई, निबोडि,सुमन धोंडे,श्रेयस देशमुख,दिपक ससाने,यांच्यासह संभाजीनगर येथील दिव्यांग आक्रोश मोर्चात आष्टी तालुक्यातील दिव्यांग बंधू-भगिनी मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव हितार्थ सहभागी झाले होते.

# जिंतूर मध्ये SC-ST सामाजिक ऐक्य परिषदेचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जिंतूर । प्रतिनिधी**

जागतीक आदिवासी दिनानिमित्त जिंतूर शहरात ०९ ऑगस्ट शुक्रवार रोजी मराठवाड्यात प्रथमच होणारी 'अनुसूचित जाती जमाती सामाजिक ऐक्य परिषद आयोजीत करण्यात आली आहे. या परिषदेला जिंतूर तालुक्यातून ग्रामीण भागातील अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील हजारो महिला पुरुष सहभागी होणार असल्याची माहिती परिषदेच्या आयोजन समितीकडून देण्यात आली आहे. अधिक माहिती अशी की, जिंतूर मध्ये दरवर्षी जागतीक आदिवासी दीन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो, देश आणि राज्यातील अनुसूचित जाती जमाती प्रवर्गावर वाढत्या अन्यायाची सद्यस्थिती पाहता अनु.जाती जमाती ऐक्याची नितांत गरज ओळखून यावेळी मात्र जिंतूर तालुक्यात अनु.जाती जमाती प्रवर्गातील बहुसंख्येने असणाऱ्या बौध्द आदिवासी मातंग चर्मकार ढोर पारधी होलेर आणि ईतर जाती समूहातील सामाजिक संघटनेचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या एकमताने या कार्यक्रमा निमित्त एकीची वज्रमूठ आवळली आहे.

जागतीक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी संस्कृती आणि परंपरा यांचे दर्शन घडवणारी महारॅली जननायक बिरसा मुंडा चौकातून सुरुवात होऊन संपूर्ण जिंतूर शहरातून संपन्न होणार आहे. या परिषदेचे अध्यक्ष ॲड. दशरथ वाळके स्वागताध्यक्ष शरद चव्हाण उद्घाटक दत्ता ढाकरे प्रमुख मार्गदर्शक दशरथ मडावी यवतमाळ विशेष अतिथी म्हणून उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर, ऊमाकांत पारधी उपजिल्हाधकारी हिंगोली, उपविभागीय पोलिस अधिकारी सोनाजी आमले हिंगोली, सदानंद मेंडके सपोनी मुंबई, विकास कोकाटे सपोनी नांदेड, पिराजी तायवाडे सपोनी उमरगा, सुरेश नरवाडे सपोनी धाराशिव, तसेच जिंतूर तहसीलदार राजेश सरवदे, आणि जिंतूर पोलीस निरीक्षक बुद्धिराज सुकाळे हे उपस्थीत राहणार आहेत. या परिषदेत सामाजिक न्यायासाठी आवश्यक असणारे ठराव एकमताने संमत करून राज्याचे राज्यपाल यांच्या मार्फत केंद्र शासनाकडे पाठविले जाणार असून या परिषदेला जिंतूर तालुक्यातील अनु.जाती जमाती प्रवर्गातील सर्व क्षेत्रात कार्यरत असणारे प्रतिष्ठीत नागरिक आणि कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.गेले काही दिवसांपासून परिषदेच्या यशस्वी तेची तयारी जोरात सुरू असून या परिषदेला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समितीचे भगीरथ मिरासे, पत्रकार रत्नदीप शेजावळे, सतीश वाकळे, भानुदास वाळके, दत्ता चापे, शंकर वाघ, राजेश्वर कऱ्हाळे, प्रविण वाकळे, किशोर मोरे, कृष्णा साबळे युवराज घन सावध, लखन खिलारे, दयानंद प्रधान, सिद्धार्थ निकाळजे,कपिल वाकळे, प्रकाश वाहुळे यांनी केले आहे.

# नवकवी राजेश घणघाव यांच्या कवीता गायनाने विद्यार्थी मंत्रमूग्ध



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मानवत । प्रतिनिधी**

रत्नापूर शाळेत विविध उपक्रम घेऊन केला साजरा ''मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा -२ या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथ. शाळा रत्नापूर येथे मुलांना शिकण्याची गोडी व शाळेविषयी आवड निर्माण होण्यासाठी शाळेमधे कविता गायनाचा कार्यक्रम घेण्यात आला. नवकवी कवीवर्य श्री. राजेशजी घनघाव यांनी शिक्षण विषयक जनजागृती निर्माण करणार्या व महापुरुषांच्या जीवनावर आधारित कविता सादर केल्या.

मुलांनीही त्यांना टाळ्या वाजवून साथ दिली. तसेच संगीतमय कवायत, योगासने, वाद-विवाद स्पर्धा, महावाचन विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही केले. कवी शाळेचा हिरवागार परिसर बघून आनंदित झाले. कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. चंद्रकांत पौळ यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

# कोल्हा येथे डेंग्यू व चिकनगुनिया या रोगाबद्दल जनजागृती मोहीम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र कोल्हा येथील आरोग्य कर्मचारी यांनी आज दिनांक ७- ऑगस्ट बुधवार रोजी संपूर्ण कोल्हा गावाचे सर्वेक्षण करून डेंग्यू चिकनगुनिया हिवताप हत्तीरोग इत्यादी आजाराबाबत जनजागृती सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने करण्यात आली. सर्वेक्षण मोहीम आरोग्य सहाय्यक श्री नागरगोजे यांच्या



मार्गदर्शनाखाली आरोग्य कर्मचारी व आशा कार्यकर्ते यांनी मिळून केले यावेळी श्री वाघमारे आरोग्य सेवक सुभाष फुलवरे,श्री गजलकर, श्री काळे,श्री गोंधळ कर,आरोग्य सेविका श्रीमती सरोदे, आशा सुपरवायझर श्रीमती चौरे, श्रीमतीमीनाक्षी गोरे, आशा कार्यकर्ती अशामती तिडके, मीरा घागरे, वंदना भिसे, श्रीमती गायकवाड उपस्थित होत्या. प्रमोद तारे शिवसेना उपजिल्हाप्रमुख पाथरी विधानसभा, परभणी यांची यावेळी गावामध्ये भेट घेतली. सर्वेक्षण करून पाणी स्वच्छता परिसर स्वच्छता आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळणे या कामी गावकऱ्यांनी चांगले सहकार्य केले.

# कौसडी ग्रा.पं.च्या ग्रामसेवकाचा पद भार अंबादास वाटुळे यांनी स्वीकारला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी ग्रामपंचायत च्या ग्रामसेवकाचा पदभार अंबादास वाटुळे यांनी दिनांक ७ ऑगस्ट रोजी स्वीकारला. कौसडी ग्रामपंचायतला मागील अनेक दिवसापासून ग्रामसेवक उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांची विविध कामे खोळंबली होती ग्रामपंचायत कडून लागणारे कागदपत्रांसाठी अडचण निर्माण होत होती. जिंतूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कदम यांनी यांना आदेशित केल्यानंतर. ग्रामसेवक वाटुळे यांनी बुधवार दिनांक ७ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायतला येऊन पदभार स्वीकारले. याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपसरपंच प्रतिनिधी रवी देशमुख, तातेराव बारवकर, मुजाहिद कादरी, गणपतराव बहिरट, अन्वर पटेल, समीर पठाण, बालासाहेब बहिरट, नाथा इखे, अब्दुल सलाम, रघुनाथ कळासने, अरविंदराव देशमुख, वाजेद अन्सारी, ज्ञानेश्वर बारवकर, कैलास राठोड, अन्वर बेग, ज्ञानेश्वर जीवने, बाळू देशमुख यांच्यासह ग्रामस्थ व कर्मचारी उपस्थित होते.



कौसडीच्या ग्रामपंचायत च्या ग्रामसेवकाचे पदभार स्वीकारण्यासाठी अंबादास वाटुळे

# बंधुतेच्या विचारानेच समाजातील अराजकता नष्ट होईल-डॉ.अविनाश संगोलेकर

## पहिल्या विश्वबंधुता विद्यार्थी-शिक्षक साहित्य संमेलन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

विश्व बंधुता साहित्य परिषद आणि भारतीय जैन संघटनेचे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय वाघोली येथे ऐतिहासिक पहिले विश्व बंधुता विद्यार्थी आणि शिक्षक साहित्य संमेलन मोठ्या थाटामाटात पार पडले.

आपल्या मातीला साहित्य संमेलनाची परंपरा आहे. त्यातून सामाजिक अभिसरण होत असते. समाजात जाती-धर्माच्या नावाखाली सध्या अराजकता वाढत आहे. ही अराजकता नष्ट करायची असेल, तर बंधुतेचा विचार जनमानसात रुजायला हवा. बंधुता साहित्य संमेलनाच्या माध्यमातून बंधुतेची पायाभरणी करण्याचे काम होतेय, सुखावह बाब आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी केले.बंधुता लोकचळवळीच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त विश्वबंधुता साहित्य परिषद व भारतीय जैन संघटनेचे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या विश्वबंधुता विद्यार्थी-शिक्षक साहित्य संमेलनाचे उद्घाटन प्रा. डॉ. अविनाश सांगोलेकर यांच्या हस्ते झाले. प्रसंगी संमेलनाध्यक्षा डॉ. सविता पाटील, स्वागताध्यक्ष सुरेश साळुंके, बंधुताचार्य प्रकाश रोकडे, प्राचार्य. डॉ. संजय गायकवाड, प्रा. चंद्रकांत वानखेडे , महाराष्ट्र साहित्य दर्पण या वृत्तपत्राचे संपादक , प्रसिद्ध साहित्यिक,कवी , श्री .गुलाबराजा फुलमाळी, बडोपंत कांबळे आदी उपस्थित होते. प्रा. चंद्रकांत वानखेडे लिखित 'बीजेएस' गीताचे लोकार्पण, सरला कापसे लिखित 'गगनभरारी' काव्यसंग्रहाचे




प्रकाशन झाले. 'बंधुता गुणवंत विद्यार्थी पुरस्कार' प्रदान करण्यात आले.डॉ. अविनाश सांगोलेकर म्हणाले, वंचित, दुर्लक्षित घटकांना आत्मसन्मान देणारे साहित्य निर्माण व्हावे. साहित्यामुळे क्रांतीची ज्योत पेटते. शिक्षण क्रांतीचे मूळ आहे. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांची अस्थिर मानसिकता ओळखत पाठ्यपुस्तकापलीकडचे शिक्षण द्यावे. बुद्धीला, विचारांना चांगले वळण लावण्याचे काम शिक्षकांचे असते. स्त्रीशक्तीचा गौरव,सन्मान करण्याची मानसिकता आपण रुजवायला हवी.डॉ. सविता पाटील म्हणाल्या, विद्यार्थ्यांच्या मनामध्ये बंधुतेच्या कार्याचे महत्त्व पटवून देण्याचे काम हे शिक्षकांचे आहे. समाजातील कोणताही बदल हा शिक्षकांच्या माध्यमातून यशस्वीपणे व प्रभावीपणे राबवता येतो. विश्वबंधुतेची शिकवण ही संतांच्या शिकवणीतून समाजाला प्रेरित करते. विश्वातील ज्ञान, बुद्धीवंतांनी लेखणीच्या व वाणीच्या माध्यमातून बंधुतेचा जागर केला आहे.बंधुताचार्य प्रकाश रोकडे म्हणाले, बंधुतेच्या विचारांचे बीजारोपण जनमनात होण्याचा आग्रह संमलेनामागे आहे. बंधुभावाचा अभाव असतो, तिथे अस्थिरता दिसते. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नाते दृढ होण्यास हे संमेलन महत्वाचे आहे. प्रा. शंकर आथरे यांनी सूत्रसंचालन, सुरेश साळुंके यांनी स्वागतपर भाषण, तर डॉ. संजय गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. सहदेव चव्हाण यांनी आभार मानले.

# शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महेश (कडा) सहकारी कारखाना लवकरच सुरू करणार-राम खाडे






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी मतदार संघातील शेतकऱ्यांची कामधेनु असलेला महेश (कडा) सहकारी साखर कारखाना २०११ पासून राजकीय पूढारी तथा माजी आमदाराच्या उदासीनतेमुळे बंद आहे.कारखाना बंद असल्यामुळे आष्टी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर दुसऱ्या ठिकाणच्या कारखान्यावर दुजाभाव केला जातो.कडा कारखाना हा शेतकरी,कामगार, ऊस उत्पादक शेतकरी,सभासद यांच्यासाठी हा जिव्हाळ्याचा विषय आहे.कारखाना बंद असल्याने मतदार संघातील ऊस उत्पादक शेतकरी मागील अनेक वर्षापासून अडचणीत सापडलेला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली महेश (कडा) सहकारी साखर कारखाना लवकरच सुरू करणार असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते तथा आष्टी विधानसभा अध्यक्ष राम खाडे यांनी गुरुवार दि. ८ ऑगस्ट रोजी कडा कारखाना येथे उपोषणा दरम्यान केले.कडा कारखाना सुरू करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी कारखान्या समोरील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या उपोषणात एडवोकेट एन एल जाधव,कामगार युनियनचे अध्यक्ष नवनाथ साबळे,गंगाधर आबा आजबे, कॉम्रेड महादेवराव नागरगोजे, भाई विष्णुपंत घोलप,नवनाथराव आटोळे,कामगार संघटनेचे बाजीराव थोरात,रावसाहेब जाधव,माजी सरपंच राहुल काकडे,बाळासाहेब मिसाळ, पंचायत समिती सदस्य दादासाहेब झांजे,दिनकरराव खिळे,राजेश कराड,शैलेश थोरवे, अहमद पठाण,अशोक पोकळे,बाबा म्हस्के,अशोक मस्के,तात्यासाहेब जेवे,परमेश्वर नागरगोजे,दादा निंबाळकर, किसन जाधव,शेख गणीभाई तांबोळी,माऊली आस्वर यांच्यासह तालुक्यातील शेतकरी, कामगार,विविध संघटनेचे नेते आदी या उपोषणात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आपल्या भाषणात राम खाडे पुढे म्हणाले की,कधी आसमानी कधी दुष्काळी अशा अनेक संकटाचा सामना करीत असलेला शेतकरी कारखाना सुरू झाला तर त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येणार नाही.आष्टी मतदार संघाचे माजी आमदार यांना कारखाना चालू होऊ द्यायचा नाही.कारखान्याचा प्रश्न सतत झुलवत ठेवायचा,कामगाराला थकीत वेतन मिळू द्यायचे नाही, कारखाना चालू करण्यासाठी कोणी आंदोलन करत असेल तर त्याला आंदोलन करू द्यायचे नाही असे अनेक प्रकार माजी आमदारांकडून आष्टी तालुक्यात सुरू आहेत.यामुळे मतदार संघातील सर्व सामान्य शेतकरी, ऊस उत्पादक शेतकऱ्यावर जाणून बुजून अन्याय करण्याचे काम माजी आमदाराकडून सुरू आहेत.सदरील कारखाना सुरू झाला तर मतदार संघातील अनेक गोरगरीब कामगारांचे उध्वस्त झालेले संसार पुन्हा फुलतील.त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार साहेब यांची भेट घेऊन लवकरच महेश (कडा) सहकारी साखर कारखाना सुरू करणार असल्याचे प्रतिपादन राम खाडे यांनी यावेळी केले. यावेळी विष्णुपंत घोलप आपल्या भाषणात म्हणाले की, कारखान्याच्या प्रश्नावर मी पक्षाचा जबाबदार म्हणून आपल्या सोबत राहील.कारण संघर्षाशिवाय काहीच मिळणार नाही.आष्टी विधानसभेतील लोकप्रतिनिधी बेजबाबदार आहेत.तज्ञांच्या सहकार्याने कारखाना सुरू करण्यासाठी ताकदीने काम करू असे सांगितले.यावेळी नवनाथ आटोळे यांनी कामगारांच्या पाठीमागे खाडे साहेब तुम्ही उभे आहात,शिवसेना (उ बा ठा) कायम कारखान्याच्या प्रश्नावर आपल्या बरोबर राहील असे प्रतिपादन नवनाथ आटोळे यांनी यावेळी केले.तर कॉम्रेड महादेव नागरगोजे यांनी आपल्या भाषणात सांगितले की,या कारखान्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान फार मोठे आहे. कारखाना सुरू करण्यासाठी आपल्याला खूप मोठे आंदोलन करावे लागणार आहे.शेतकरी व कामगारांची चळवळ उभी करावी लागणार असल्याचे मत कॉ. नागरगोजे यांनी केले. या आंदोलनाला आष्टी तालुक्यातील कामगार,ऊस उत्पादक शेतकरी,विविध संघटनेचे पदाधिकारी,कार्यकर्ते आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कंधार लोहा विभागातून उत्कृष्ट पोलीस पाटील म्हणून जोमेगांव येथील पोलीस पाटील मारोती धोंडीबा पांचाळ यांना नांदेड जिल्हाचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी सन्मानित केले.(छाया- बाजीराव गायकवाड दैनिक लोकनेता नांदेड जिल्हा प्रतिनिधी)

### रत्नाळीच्या सहकारी सोसायटीवर काँग्रेसचा झेंडा

## राष्ट्रवादीला धक्का देत चेअरमन पदी लक्ष्मण उल्लेवाड यांची बिनविरोध निवड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

धर्माबाद : सहकारी सोसायटी चे निवडणूक दीड ते दोन मागे झाले होते तेव्हा चेअरमन पदी कै. विनायकराव कुलकर्णी यांची निवड करण्यात आले होते. पण त्यांचे १/१०/२३ रोजी विनायकराव कुलकर्णी यांचे निधन झाले. तेव्हापासून चेअरमन पद हे रिक्त झाल्यामुळे (ता. ९) गुरुवार रोजी सहकारी सोसायटीच्या निवडणूक विशेष सभा घेण्यात आले.या निवडणुकीमध्ये बारा संचालक पैकी शेतकरी विकास पॅनलचे सात संचालक यांच्या एकमताने लक्ष्मण हरिभाऊ उल्लेवाड संस्थेच्या चेअरमन व व्हाइस चेअरमनची चातरमल मोगलाजी पोशट्टी निवड करण्यात आले.करण्यासाठी सहकार अधिकारी एम. टी. सावळसेकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन केले होते. लक्ष्मण हरिभाऊ उल्लेवाड यांचा चेअरमन पदी तर चातरमल मोगलाजी पोशट्टी यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. संचालक पवार किशनराव गंगाधर,लखमावाड दिगांबर टोपाजी,गोणारकर भोजराम आडेलू,लोखंडे चंपावली लक्ष्मण पा.,विजयाबाई बापूराव पवार,शंकर पा.रामचंद्र पा. होट्टे,किरण नारायण पा.बेंद्रे उपस्थित होते. निवड झालेल्या नवनिर्वाचित चेअरमन, व व्हाईस चेअरमन यांचे विद्यमान खासदार वसंतराव चव्हाण यांनी शुभेच्छा दिले.या वेळी गोविंदा पा. जाधव नरेंद्र रेड्डी बाळापूरकर,विठ्ठल कोंडलवाडे श्रीकांत उल्लेवाड, संदिप पाटील पवार, प्रकाश लोखंडे,यलप्पा पंदेनवाड, साईनाथ बोईनवाड,कापिलवाड पिराजी,सायारेड्डी बोमिनवाड,आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी लक्ष्मण हरिभाऊ उल्लेवाड यांची, तर व्हाइस चेअरमनपदी चातरमल मोगलाजी पोशट्टी यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

### न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मध्ये

## नूतन संस्था अध्यक्ष डॉ.अनिकेत देशमुख यांचा सत्कार संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला च्या संस्था अध्यक्षपदी डॉक्टर अनिकेत देशमुख यांची निवड झाल्याबद्दल या शिक्षण संकुलातील सर्व शिक्षकांमार्फत सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, याचबरोबर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त शिक्षकांचाही सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी यांच्या शुभहस्ते नूतन संस्था अध्यक्ष डॉ. अनिकेत देशमुख यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. माजी प्राचार्य प्रा नामदेव कोळेकर व ज्येष्ठ शिक्षक नीलकंठ लिंगे यांचा सेवानिवृत्ती निमित्त नूतन संस्था अध्यक्ष डॉ. अनिकेत देशमुख व संस्था सचिव माननीय विठ्ठलराव शिंदे सर यांच्या शुभहस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संस्था सदस्य बबनराव जानकर, प्रा. डॉ.अशोकराव शिंदे, प्रा दीपक खटकाळे, प्रा जयंत जानकर, न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला चे प्राचार्य प्रा. केशव माने, उपमुख्याध्यापक प्रा संजय शिंगाडे, उपप्राचार्य प्रा संतोष जाधव, पर्यवेक्षक श्री तानाजी सूर्य गंध श्री दशरथ जाधव श्री तातोबा इमडे सर, न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मधील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आपले मनोगत मध्ये नूतन संस्था अध्यक्ष डॉ. अनिकेत देशमुख यांनी शिक्षक एक उत्तम पिढी बनवू शकतो, सुसंस्कारित विद्यार्थी घडवून समाजामध्ये प्रतिनिधित्व करण्यासाठी तयार करू शकतात. इथून पुढील काळामध्ये या संस्थेमध्ये जास्तीत जास्त वेळ देणार असल्याचे सांगितले. आपल्या अध्यक्षीय मनोगत मध्ये बोलताना संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे सर यांनी सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला या संस्थेची स्थापना तालुक्यातील गोरगरीब, सर्वसामान्य, कष्टकरी शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे या हेतूने, स्व. डॉ. भाई गणपतरावजी देशमुख यांच्या प्रेरणेने झाली. या वेलरुपी शिक्षण संस्थेचे वटवृक्षात रूपांतर झाले असून आज या संस्थेमध्ये पाच हजारहून अधिक विद्यार्थी शिकत असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ.जुलेखा मुलाणी मॅडम व प्रा संतोष राजगुरू यांनी केले तर आभार संस्कृतिक विभाग प्रमुख प्रा मिलिंद पवार यांनी केले.

# भिगवण पोलीसांची सिंघम कामगिरी ९ किलो ८० ग्रॅम वजनाची अफुची पावडर केली जप्त

## २५,९०,८००/ किंमतीचा मुद्देमाल हस्तगत !

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

भिगवण (ता.इंदापूर) पोलीस स्टेशन यांनी बेकायदेशीर अफुची पावडर/भुगा बाळगणाऱ्या दोन इसमांवर केली कायदेशीर कारवाई,त्यांचे ताब्यातुन ०९ किलो ०८० ग्रॅम वजनाची अफुची पावडर/भुगा व साधने असा एकुण किंमत रूपये २५,९०,८००/- किंमतीचा चा मुद्देमाल केला हस्तगत.भिगवण पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी विनोद महांगडे, सहा.पोलीस निरीक्षक यांनी पंकज देशमुख पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व पोलीस जवान यांना पोलीस स्टेशनचे हद्दीत सतर्क रित्या पेट्रोलींग करून आपले खास माहीतगार बातमीदार यांचे मार्फतीने अवैद्य धंदे करणारे इसमांबाबत माहीती काढून कायदेशीर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

तसेच भिगवण पोलीस स्टेशनचे हददीतील तमाम नागरीक यांना पोलीस स्टेशनचे हददीत काही अवैध धंदे चालु असल्यास तात्काळ भिगवण पोलीस स्टेशन येथे किंवा डायल ११२ वर कॉल वरून माहीती देणेबाबत आव्हान केले होते. त्यानुसार दिनांक.०२/०८/२०२४ रोजी दुपारी १६:१४ वा.चे सुमारास बातमीदार यांचे मार्केत डायल ११२ वर माहीती मिळाली की, बिल्ट कंपनीचे गेटचे बाहेर पुणे सोलापुर रोड लगत उभ्या असलेल्या ट्रकमध्ये ड्रग्ज आहेत.अशी माहीती मिळाल्याने विनोद महांगडे,सहा.पो.निरीक्षक,यांनी तात्काळ मा.सुदर्शन राठोड सो,उपविभागीय पोलीस अधीकारी,बारामती उपविभाग,पुणे ग्रामीण यांना माहीती कळवुन त्यांची परवानगी घेवुन मौजे पोंधवडी गावचे हददीत बिल्ट कंपनीचे गेट समोर पुणे सोलापुर रोड लगत असणारे ट्रक चेक करीत असताना पुणे सोलापुर रोडचे कडेला ट्रक नंबर. एच.आर.५८/सी.१३०७ हा उभा असलेला दिसला. त्याची पाहणी केली असता त्यामध्ये अफूची पावडर/भुगा ०९ किलो ०८० ग्रॅम मिळुन आली. त्यामुळे गाडीतील इसम नामे १) सुखविंदर निरंजन सिंह,रा.राधा स्वामी सत्संग भवन,जम्मु कॉलनी.बी. यमुनानगर,हिरयाना,२) रविंद्र कुलबिरसिंग, रा. राधापुर रोड,कॅम्प यमुनानगर,हिरयाना यांना ताब्यात घेवून चौकशी केली असता त्यांनी अवैध रित्या आपले कब्जात बेकायदा बिगर परवाना उग्र आमली पदार्थ अफूची पावडर/भुगा जवळ बाळगल्याची कबुली दिली,त्यांचे ताब्यातुन आमली पदार्थ अफुची पावडर/भुगा ०९ किलो ०८० ग्रॅम, किंमत रूपये ९०,८००/- रू या व ट्रक नंबर एच. आर.५८/सी.१३०७ किंमत २५,००,०००/- रूपये असा एकूण २५,९०,८००/- रू किंमतीचा मुदद्देमाल जप्त करून भिगवण पोलीस स्टेशन,गुन्हा रजि. नंबर २५८/२०२४,भारतीय न्याय संहीता कायदा सन.२०२३ने कलम ३(५), सह गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ थे कलम ८ (क), १७ (क), प्रमाणे गुन्हा दाखल करून आरोपी यांना सदर गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास विक्रम जाधव, पोलीस उपनिरीक्षक,हे करीत आहेत.सदरची कामगिरी पंकज देखमुख,पोलीस अधीक्षक,पुणे ग्रामीण,संजय जाधव,अपर पोलीस अधीक्षक,बारामती विभाग,पुणे ग्रामीण,सुदर्शन राठोड सहा,उपविभागीय पोलीस अधीकारी, बारामती विभाग,अविनाश शिळीमकर,वरीष्ठ पोलीस निरीक्षक,स्थानिक गुन्हे शाखा,पुणे ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली मा.अविनाश भगवान डोईफोडे नायब तहसिलदार इंदापुर,सूर्यकांत कोकणे,पोलीस निरीक्षक,इंदापुर पोलीस स्टेशन, योगेश लंगुटे, सपोनि,स्था.गु.अ.शाखा पुणे ग्रामीण, सनिल धनवे,पोलीस उपनिरीक्षक,भिगवण पोलीस स्टेशन,पोलीस अंमलदार सचिन पवार, साईनाथ भिसे,रणजित मुळीक,प्रसाद पवार,शहाजी सुद्रीक, प्रमोद गलांडे यांनी केली आहे.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904